सोमवार, दि. ८ ऑगस्ट २०२२



# मिळालेल्या संधीचे सोनं करायला शिका: प्रा. डॉ. हेमंत पेडणेकर

दोडामार्ग, ७ ऑगस्ट (प्रतिनिधी) - आयुष्यात प्रत्येकाला मोठ होण्याचा अधिकार आहे. पण त्यासाठी कठीण परिश्रम, कष्ट करण्याची तयारी विद्यार्थ्यांनी दाखवायला हवी. प्रत्येक क्षणाला विशेष महत्व देऊन कार्य करायला हवे, कोणतेही काम असो ते निसंकोचपणे करायला हवे व आपण कायम कष्ट, अभ्यास, काहीतरी नवीन शिकण्याची तयारी दाखविली पाहिजे. आणि जे काम आपल्याला भेटत जाते ती एक प्रकारची संधी आहे, असे समजून काम करत राहिलात तर तुमच्या आयुष्याच सोन होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तकं निर्मिती मंडळाचे सदस्य डॉ. पेडणेकर यांनी स्पष्ट केले.

येथील नवनिर्माण शिक्षण संस्थेचे लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय दोडामार्ग महाविद्यालयाचा २१ वा वर्धापन दिन संपन्न झाला. त्यावेळ. ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठवर संस्थेचे सूर्यकांत परमेकर, पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर, महाविद्यालय विकास समिती सदस्य विवेकानंद नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यांसह सर्व प्राध्यपक, महाविद्यालयिन कर्मचारी,व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांनी केल. प्रास्ताविक प्रा. रामकीसन मोरे, तर आभार डॉ. सीताराम खडकपकर यांनी मानले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे यांच्या जीवनपट बॅनरचेही यावेळी अनावरण करण्यात आले. शिवाय टिचिंग एड्स सेंटरचेही मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



नवनिर्माण शिक्षण संस्थेचे लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय दोडामार्ग महाविद्यालयाचा वर्धापन दिन संपन्न झाला. यावेळी प्रा. डॉ. हेमंत पेडणेकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपिटावर मान्यवर दिसत आहेत.